वाचा :- महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांचेकडील क्र.संकिण -२०१८/प्र.क्र.१३/मातक तारीख २२फ्रेबुवारी २०१९

क्र.नागरी भूमापन -३/सनद फी आकारणी/प्र.क्र.१३८/२०

जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख
(म.राज्य) , पुणे यांचे कार्यालय
पुणे दिनांक १२/११/२०२०

परिपत्रक

विषय :- ड्रोनव्दारे गावठाण भुमापन झालेल्या गावाचे सनद फी आकारणीबावत.

ग्रामविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.संकिण -२०१८/प्र.क्र.१३/मातंक तारीख २२ फ्रेबुवारी २०१९ चे शासन निर्णयान्वये राज्यातील गावठाण जमाबंदी प्रकल्प राबविण्यास मान्यता दिलेली आहे. सदर शासन प्रकल्पाअंतर्गत गावठाणातील मिळकतींचे भूमापन करून मिळकतपत्रिका स्वरूपात अभिलेख तयार करणे व जनतेस देणे असे अपेक्षित आहे.सदर शासन निर्णयान्वये खर्चाबाबत व सनद फी वसुलीबाबत तरतूद दिलेली आहे ती खालीलप्रमाणे.

भूमि अभिलेख विभागामार्फत मिळकतपत्रिका तयार करणे (भाग एक) व ग्रामीण विकास विभागामार्फत मालमत्ता पत्रक तयार करणे व मालमत्ता नोंदवही तयार करणे (भाग दोन) असे दोन्ही भाग मिळून सर्वसाधारणपणे प्रती मालमत्ता रू ५००/- इतक्या सरासरी खर्चास मान्यता देण्यात येत असून मालमत्तावर मालमत्ता क्षेत्राप्रमाणे सनद व इतर फी म्हणून सरासरी रू ५००/- प्राप्त करण्यास मान्यता देण्यात येत आहे. ही रक्कम प्राप्त करत असताना ज्या मिळकतीचे क्षेत्र २५ चौ.मी. पेक्षा कमी असेल त्याची फी सवलतीच्या दराने आकारण्यात येईल.मिळकतीचे क्षेत्रानिहाय आकारावयाच्या रक्कमेबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील .

महाराष्ट्र राज्यात अत्याधुनिक ड्रोनव्दारे गावठाण भुमापन झालेल्या १११ गावाचा गावठाणातील मिळकतींचे चौकशी अंती सत्ताप्रकार निहाय मिळकतीचे क्षेत्र व संख्या उपलब्ध आहे . १११ गावाचा डाटा तपासणी करणेत आला . सदर डाटाचे आधारे एकत्रीत अभ्यास केला असता, शासन निर्णयाचे अनुषगाने ड्रोनव्दारे गावठाण भुमापन झालेल्या गावाचा खर्च वसुल करणेकरीता खाजगी धारकाच्या मिळकत क्षेत्राच्या टप्पेनिहाय खालीलप्रमाणे सनद फी दर ठरविण्यात येत आहे.

| अ.क्र. | क्षेत्रफळ (चौ.मी.) | रूपये |
|---|---|---|
| १ | १ चौ.मी. ते २५ चौ.मी पर्यंत | १२५ |
| २ | २५ चौ.मी पेक्षा जास्त ते ५० चौ.मी पर्यंत. | २५० |
| ३ | ५० चौ.मी पेक्षा जास्त ते १०० चौ.मी पर्यंत. | ५०० |
| ४ | १०० चौ.मि.पुढील प्रत्येक चौ.मी क्षेत्रास | र.रू ५/- प्रति चौ.मि.या दराप्रमाणे आकारण्यात येईल |

उपरोक्त प्रमाणे ड्रोनव्दारे गावठाण भुमापन झालेल्या गावाची सनद फी नियमाप्रमाणे वसुल करणेत यावी.

स्वाक्षरी/-xxx
(एस. चोक्कलिंगम)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे

प्रत :- अप्पर जमाबंदी आयुक्त आणि अतिरीक्त संचालक भूमि अभिलेख , पुणे यांना माहीतीसाठी